दैनिक
# महिला संवाद
MAHILA SANVAD

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड




शुभेच्छुक : दैनिक महिला संवाद, महाराष्ट्र

PUNE : Volume No. 1, Issue No. 263, Marathi Daily Tuesday, Date - 14 April 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २६३ वा | मराठी दैनिक | मंगळवार दि. १४ एप्रिल २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

# मी आरोपी नाही, निर्दोष व्यक्ती म्हणून उभा

## दिल्ली मद्य धोरण प्रकरण; उच्च न्यायालयात अरविंद केजरीवाल यांचा युक्तिवाद

**दिल्ली । प्रतिनिधी**

दिल्ली मद्य धोरण प्रकरणात माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी उच्च न्यायालयात स्वतः बाजू मांडत महत्त्वपूर्ण युक्तिवाद केला. मी आज न्यायालयासमोर केवळ आरोपी म्हणून नाही, तर निर्दोष मुक्तता झालेली व्यक्ती म्हणून उभा आहे, असे ते म्हणाले. 'अधिवक्ता कायदा, १९६१' च्या कलम ३२ अंतर्गत त्यांनी स्वतःचे प्रतिनिधित्व केले.

सोमवारी झालेल्या सुनावणीत कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशाविरोधात सीबीआयने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी झाली. या याचिकेत न्यायमूर्ती स्वर्ण कांता शर्मा यांनी स्वतःला प्रकरणातून अलिप्त ठेवावे, अशी मागणी करण्यात आली आहे. सुनावणीदरम्यान केजरीवाल यांनी न्यायालयाविषयी आदर व्यक्त करताना, साक्षीदारांच्या जबाबांबाबत न्यायालयाने केलेल्या पूर्वीच्या निरीक्षणांमुळे आपल्याला आधीच दोषी ठरवले जात असल्याची भावना निर्माण झाल्याचे सांगितले.

ते म्हणाले की, ईडी आणि सीबीआयने साक्षीदारांना आधी अटक करून नंतर त्यांच्याशी तडजोड करत इतरांविरोधात जबाब नोंदवले. या प्रक्रियेवर न्यायालयानेही निरीक्षण नोंदवले असल्याचे त्यांनी नमूद केले. कनिष्ठ न्यायालयाने तीन महिन्यांच्या सखोल सुनावणीनंतर आपली निर्दोष मुक्तता केल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

केजरीवाल यांनी सांगितले की, त्या निर्णयानंतरही सीबीआयने पुनरीक्षण याचिका दाखल केली. त्या आदेशानंतर मला न्याय मिळेल का, याबद्दल शंका निर्माण झाली होती. त्यामुळेच मी मुख्य न्यायाधीशांना पत्र लिहून प्रकरण दुसऱ्या खंडपीठाकडे सोपवण्याची विनंती केली, असे त्यांनी स्पष्ट केले.

सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयाचा दाखला देत त्यांनी म्हटले की, न्यायाधीशांविषयी प्रत्यक्ष पूर्वग्रह सिद्ध करणे आवश्यक नसते; मात्र वाजवी शंका निर्माण झाली तरी न्यायाधीशांनी स्वतःला प्रकरणातून दूर ठेवावे.



आपल्या बाबतीतही अशीच शंका निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. यासोबतच, न्यायाधीशांनी स्वतःला बाजूला घेण्याचा मुद्दा हा न्यायालय आणि संबंधित पक्षांपुरता मर्यादित असल्याचा दावा करत, या प्रक्रियेत सीबीआयला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसल्याचे त्यांनी नमूद केले.

सुनावणीदरम्यान त्यांनी ९ मार्च रोजी झालेल्या पहिल्या सुनावणीचा उल्लेख करत, इतर पक्षांना न ऐकता दिलेल्या एकतर्फी आदेशावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

केवळ काही मिनिटांत कनिष्ठ न्यायालयाचा सविस्तर निकाल रद्द करण्यात आल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली.

दिल्ली मद्य धोरण प्रकरण २०२१ मध्ये सुरू झाले. महसूल वाढवण्यासाठी तयार करण्यात आलेल्या या धोरणात अनियमितता झाल्याचे आरोप झाल्यानंतर ते मागे घेण्यात आले. त्यानंतर नायब राज्यपालांनी सीबीआय चौकशीचे आदेश दिले. सीबीआय आणि ईडीच्या मते, या धोरणातून खाजगी कंपन्यांना अवाजवी लाभ देण्यात आला आणि भ्रष्टाचार झाला.

## थोडक्यात...

### दैठणा शिवारात दुधना नदीतून अवैध वाळू उत्खनन सुरूच



**जालना । प्रतिनिधी**

घनसावंगी तालुक्यातील दैठणा शिवारातील दुधना नदी पात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उत्खनन सुरू असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, दिवसाढवळ्या तसेच रात्रीच्या सुमारासही ट्रॅक्टर व हायवा वाहनांच्या साहाय्याने बेसुमार वाळू उपसा केला जात आहे.

नदी पात्रातील नैसर्गिक समतोल राखणारी वाळू मोठ्या प्रमाणावर काढून नेल्यामुळे पर्यावरणीय हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे नदीचा प्रवाह बदलणे, पाण्याची पातळी खालावणे तसेच परिसरातील शेतीवरही विपरीत परिणाम होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे, या अवैध उत्खननाकडे महसूल विभाग व संबंधित प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

दरम्यान, अवैध वाळू माफियांचा दबदबा वाढत असून, प्रशासनाची कारवाई केवळ कागदोपत्रीच मर्यादित असल्याची चर्चा रंगू लागली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकाराची तात्काळ दखल घेऊन अवैध उत्खननावर आळा घालावा, अशी मागणी जोर धरत आहे.

स्थानिक ग्रामस्थांनी इशारा दिला आहे की, जर प्रशासनाने लवकरात लवकर कठोर कारवाई केली नाही, तर याविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

































# संपादकीय...

## न्यायप्रक्रियेवरील प्रश्नचिन्ह

दिल्ली मद्य धोरण प्रकरणात माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी उच्च न्यायालयात स्वतः युक्तिवाद करत मांडलेली भूमिका ही केवळ एका व्यक्तीच्या बचावापुरती मर्यादित नाही, तर ती संपूर्ण न्यायप्रक्रियेवरील विश्वास, निष्पक्षता आणि संस्थात्मक पारदर्शकतेशी संबंधित गंभीर प्रश्न उपस्थित करते. मी आरोपी नाही, निर्दोष व्यक्ती म्हणून उभा आहे असे त्यांनी केलेले विधान हे केवळ भावनिक उद्गार नसून न्यायव्यवस्थेतील धारणा आणि वास्तव यातील दरी अधोरेखित करणारे आहे. लोकशाही व्यवस्थेत न्यायालये ही अंतिम आश्रयस्थान मानली जातात. एखाद्या व्यक्तीवर आरोप असो किंवा तो सत्तेत असो, न्यायालयाने त्याच्याकडे समानतेने पाहणे अपेक्षित असते. मात्र, जर एखाद्या व्यक्तीला न्यायालयाच्या निरीक्षणांमधूनच पूर्वग्रहाची भावना निर्माण होत असेल, तर हा केवळ त्या व्यक्तीचा प्रश्न राहत नाही, तर संपूर्ण न्यायव्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर परिणाम करणारा मुद्दा ठरतो. केजरीवाल यांनी मांडलेला एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे तपास यंत्रणांची कार्यपद्धती. साक्षीदारांना आधी अटक करणे, नंतर त्यांच्याशी तडजोड करून इतरांविरोधात जबाब नोंदवणे, ही पद्धत जर खरोखरच वापरली जात असेल, तर ती न्यायाच्या मूलभूत तत्त्वांनाच धक्का देणारी आहे. तपास यंत्रणांकडून निष्पक्ष, पारदर्शक आणि पुराव्यावर आधारित चौकशी अपेक्षित असते. परंतु, जर चौकशीच संशयास्पद वाटू लागली, तर न्याय मिळण्याची प्रक्रिया कमकुवत होते. याचबरोबर, कनिष्ठ न्यायालयाने तीन महिन्यांच्या सुनावणीनंतर दिलेला निर्णय काही मिनिटांत रद्द होणे, ही बाबही चिंताजनक आहे. न्यायप्रक्रिया ही सखोल विचार, पुराव्यांचे परीक्षण आणि कायदेशीर निकषांवर आधारित असावी लागते. जलद निर्णय देणे हे नेहमीच न्याय देण्यासारखे नसते. उलट, घाईत घेतलेले निर्णय अनेकदा न्यायाच्या तत्त्वांवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. या प्रकरणात न्यायाधीशांनी स्वतःला प्रकरणातून अलिप्त ठेवावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार, प्रत्यक्ष पूर्वग्रह सिद्ध करणे आवश्यक नसले, तरी वाजवी शंका निर्माण झाली तरी न्यायाधीशांनी स्वतःला दूर ठेवणे योग्य ठरते. कारण न्याय केवळ झाला पाहिजे असे नाही, तर तो दिसलाही पाहिजे, ही लोकशाहीची मूलभूत अट आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर एक मोठा प्रश्न उभा राहतो-आपल्या देशातील तपास यंत्रणा आणि न्यायव्यवस्था किती स्वायत्त आणि निष्पक्ष आहेत? राजकीय व्यक्तींशी संबंधित प्रकरणांमध्ये या संस्थांवर पक्षपातीपणाचे आरोप वारंवार होत असतात. त्यामुळे या संस्थांनी अधिक जबाबदारीने, पारदर्शकतेने आणि कायद्याच्या चौकटीत राहून काम करणे अत्यावश्यक आहे. या प्रकरणाचा अंतिम निकाल काहीही लागो, पण या संपूर्ण प्रक्रियेमुळे न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास डळमळीत होऊ नये, याची काळजी घेणे ही सर्व संबंधित संस्थांची जबाबदारी आहे. लोकशाही टिकवण्यासाठी न्यायव्यवस्था ही केवळ स्वतंत्रच नव्हे, तर निष्पक्ष आणि विश्वासार्ह असणेही तितकेच आवश्यक आहे.

# युगप्रवर्तक - दलितांचा मसीहा

भारतीय राजघटनेचे शिल्पकार,समता स्वातंत्र्य आणी बंधुता यांचे प्रबळ समर्थक,कायदामंत्री,राजनीतिज्ञ अर्थशात्रज्ञ्,न्यायिक पत्रकार,तत्वज्ञ,नॉलेज ऑफ सिम्बॉल,युगप्रवर्तक,महान् वक्ता,३२ पदव्यांचे मानकरी,चालीस हजार पुस्तकांचे जगातील सर्वात मोठे खाजगी ग्रंथालय अशा ह्या महान मुक्तीदात्यास विनम्र अभिवादन.

माझा समाज सर्वार्थाने सुधारला पाहिजे,त्यांच्यामध्ये स्वाभिमान जागा झाला पाहिजे,अन्यायाविरुद्द पेटून उठला पाहिजे,बुद्धीच्या जोरावर सारे जग जिकता आले पाहिजे असा अट्टाहास धरणारे जगज्जेते.

१९२० च्या दशकात मुंबईत दिलेल्या भाषणात त्यांनी स्पष्टपणे म्हटले होते की, जिथे माझे वैयक्तिक हित आणि देशाचे हित यांच्यात संघर्ष असेल तिथे मी देशाच्या हिताला प्राधान्य देईन. पण जिथे दलित जातींचे हित आणि देशाचे हित यांच्यात संघर्ष असेल तिथे मी दलित जातींना प्राधान्य देईन. (मनुस्मृती दहन) एक दक्षतेचे उचललेले आक्रमक पाऊल होते. परंतु ते सवर्ण हिंदुंचे लक्ष वेधून घेण्यासाठी उचलेले होते. अधूनमधून अशा प्रकारचे तीव्र उपाय योजावे लागतात. तुम्ही दार ठोठावलेच नाही, तर ते कोणी उघडणार नाही. आम्ही मनुस्मृतीचे दहन केले ते शतकानुशतके आम्ही ज्या अन्यायाखाली चिरडले गेलो त्याचे प्रतिक म्हणून. आंबेडकरांच्या मते कोणत्याही समाजाचे मूल्यमापन त्या समाजातल्या स्त्रियांची परिस्थिती कशी आहे, यावरून करता येते. समाजाने स्त्रियांच्या विकासाकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याची त्यांची आग्रही भूमिका होती. ही समग्र प्रगती केवळ पुरुषांचीच नव्हे, तर स्त्रियांची देखील होणे गरजेचे आहे, हे भान त्यांना विद्यार्थिदशेतच आले होते. ते स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते होते.

काही सत्य कोर्टात सिद्ध होतंकाही इतिहासात हरवतंआणि काही मनात कायम जिवंत राहतं .पैसा न्याय विकत घेतो असं लोक म्हणतातपण अन्यायाची जाणीव - ती कोणत्याही संपत्तीपेक्षा महाग असते आणि ती जाणीव करून देण्याचे महान कार्य बाबासाहेबांनी केले.

हिंदू कोड बिल,एक मत समान मूल्य,अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघ,समान वेतन कायदा,शिक्षणाचा मूलभूत हक्क,बहुजन शब्द न वापरता त्यांना अनुसूचित जात जमात म्हणावे हा आग्रह,

देशासाठी राज्यघटना तयार करून तमाम भारतीयांच्या हातात सामानतेचा अमृतकलश देऊन खऱ्या अर्थाने बहुजनाचे हित साधून त्यांचे हक्क अजरामर केले.अशा या महान मुक्तीदात्यास अभिवादन करायचे असेल तर विचाराने प्रगल्भ व्हा,सर्वांना घेऊन पुढे चाला,शिक्षणाची कास धरा,नुसते सुटबूट न घालता त्यामधले विचार संपादन करा,अन्याविरुद्ध पेटून उठा,मताची किंमत ओळखा,योग्य व्यक्ती - योग्य राजकर्ता, पुस्तकसंग्रह,विचारांना नैतिकचे अनुष्ठान या गोष्टी



आत्मसात केल्या तर ती बाबासाहेबांना खरी आदरांजली ठरेल.

आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांच्या हक्कांसाठी आणि सन्मानासाठी लढणाऱ्या दलित समुदायासाठी ते मसीहा म्हणून उदयास आले.

**निर्मला अप्पाराव माने जाधव ,पुणे.**

## बकरा न दिल्याच्या रागातून कुटुंबावर जीवघेणा हल्ला

**मुंबई | प्रतिनिधी**

गावदेवी जत्रेसाठी बकरा न दिल्याने एका कुटुंबावर टोळक्याने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना डोंबिवली येथील कुंभारखान परिसरात घडली आहे.

या प्रकरणात सात जणांवर विष्णुनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. रात्री अडीच वाजता काही तरुणांनी तबेल्यावर हल्ला करीत या कुटुंबाला बेदम मारहाण केली.

या टोळक्याने ऑटो रिक्षातून येऊन तबेला चालक, त्याचा भाऊ आणि त्याच्या आईला बेदम मारहाण केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

डोंबिवलीत गावदेवीची जत्रा सुरु आहे.कुंभारखान परिसरात राहणारे आशिष विठ्ठल दळवी यांचा तबेला आहे. या तबेल्यात बकरी आणि म्हशी आहेत. या परिसरात गावदेवीची जत्रा सुरु आहे.

आशीष दळवी यांच्या तबेल्यात सुजल भोसले नावाचा तरुण आला होता. त्याने तबेल्याचा चालक आशिष दळवी याला देवीच्या जत्रेसाठी बकरा मागितला.

यावेळी आशीष याने उद्या सकाळी या, मी आईला सांगून ठेवतो असे सांगितले. काही वेळात सुजल भोसले त्याचे मित्र विनय हेगडे, प्रमोद ठाकरे, यज्ञेश खंडागळे,अक्षय खंडागळे आणि अन्य दोन साथीदारांना रिक्षाने घेऊन आला. आणि त्याने आशीष आणि त्याची आई तसेच मोठ्या भावाला मारहाण जबर मारहणा केली.

## सोयगाव तालुक्यातील वरठाण येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बॅनरची विटबंना, बारा तास रास्ता रोको आंदोलन

**सोयगाव | प्रतिनिधी**

सोयगाव तालुक्यातील वरठाण येथील चौफुलीवर भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त लावण्यात आलेले बॅनरची अज्ञात समाजकंटकाने विटंबना केल्याची घटना दि.१२ रविवारी रात्री दहा वाजता समाज बांधवांच्या लक्षात आल्यावर सर्व समाज बांधवांनी वरठाण चौफुलीवर जमा होत राज्य रस्ता क्र.२४ वर १२ तास रस्ता रोको आदोलन करीत ह्या घटनेचा जाहीर निषेध करण्यात आला.

याबाबत सविस्तर माहिती अशी दि. १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती असल्याने जयंती निमित्ताने वरठाण चौफुलीवर शुभेच्छाचे बॅनर लावण्यात आले होते.हे बॅनर अज्ञाताने फाडुन विटंबना केली. या घटनेबाबत बनोटी चौकीत रीतसर तक्रार देण्यात आली. संतप्त समाजबांधवांनी राज्य रस्ता क्र.२४ वर बारा तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

त्यामुळे रात्रीच्या मुक्कामी असलेल्या बसेस पाचोरा सिल्लोड, चाळीसगाव सोयगाव, हनुमंतखेडा पाचोरा, आदी बसेस व इतर खाजगी वाहने जागेवरच थांबलेली होती ह्या रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या रस्ता रोको आंदोलनामुळे प्रवाशांची मोठी तारांबळ उडाली होती. दरम्यान दि.१३ सोमवारी सकाळी परीसरातील गावातील समाजबांधव मोठ्या संख्येने



वरठाण चौफुलीवर जमा होत आरोपीचा शोध घेऊन तात्काळ अटक करण्याची मागणी करीत होते.

त्यानंतर घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांनी आरोपीला शोधून अटक करुन कठोर शिक्षा दीली जाईल असे आश्वासन दिल्यानंतर बारा तासापासुन सुरू असलेले रास्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले व सकाळी दहा वाजता रस्ता सुरळीत करण्यात आला. ह्या घटनेप्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सोयगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक गजानन आरेकर, जमादार संदीप सुसर, राजेंद्र बर्डे, नारायण खोडे आदी तपास करीत आहेत.

# जालना जिल्ह्यातील प्राचीन हस्तलिखितांचे होणार दस्तऐवजीकरण

**जालना | प्रतिनिधी**

भारताचा समृद्ध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी केंद्र सरकारच्या संस्कृती मंत्रालयाने 'ज्ञानभारतम्' (ऋ्रूप इहरीरीं) ही महत्त्वपूर्ण योजना हाती घेतली आहे. या अभियानांतर्गत जालना जिल्ह्यातील मंदिरे, मठ, खाजगी ट्रस्ट आणि वैयक्तिक संग्राहकांकडे असलेल्या जुन्या हस्तलिखितांचे सर्वेक्षण व डिजिटायझेशन करण्यात येणार आहे. या राष्ट्रीय कार्यात जिल्हावासियांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

देशभरातील शैक्षणिक संस्था, संग्रहालये आणि खाजगी संग्राहकांच्या सहकार्याने सुमारे एक कोटीपेक्षा अधिक हस्तलिखितांचा संग्रह करण्याचा मानस केंद्र सरकारचा आहे. हस्तलिखितांचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन आणि प्रसार करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग आणि मराठी भाषा विभागाच्या मार्गदर्शनानुसार ही मोहीम जिल्ह्यात राबविली जात आहे.

जालना जिल्ह्यात या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या



मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) यांची 'जिल्हा नोडल अधिकारी' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. हे सर्वेक्षण केवळ हस्तलिखितांच्या नोंदीसाठी आहे. मूळ हस्तलिखिते मालकाकडून काढून घेतली जाणार नाहीत, तर त्यांचे केवळ शास्त्रीय पद्धतीने दस्तऐवजीकरण केले जाईल. या मोहिमेसाठी खास 'ऋ्रूप इहरीरीं' नावाचे मोबाईल ॲप्लिकेशन विकसित करण्यात आले आहे. प्रशिक्षित सर्वेक्षकांमार्फत हस्तलिखितांची पडताळणी व दस्तऐवजीकरण केले जाणार आहे.

ज्या संस्था किंवा व्यक्तींकडे प्राचीन किंवा जुनी हस्तलिखिते उपलब्ध आहेत, त्यांनी या राष्ट्रीय कार्यात प्रशासनास सहकार्य करावे. अधिक माहितीसाठी नागरिकांनी संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना बिस्कीट व केळी वाटप




**सोयगाव | प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ वी जयंती निमित्त दि.१३ सोमवारी सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रुप मातोश्री रमाबाई कॉलनी आमखेडा यांच्या वतीने ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना वसंत निकम, राष्ट्रवादीचे (एसपी) शहराध्यक्ष रवींद्र काळे, ग्राम पंचायत सदस्य बाळू बेदवे,गवणाजी नरवडे, माजी नगरसेवक सिकंदर तडवी, शेख गुलाब या मान्यवरांच्या यांच्या हस्ते बिस्कीट पुडे व केळी वाटप करण्यात आली.

यावेळी सागर श्रीखंडे, सुमित गायकवाड,अजय गायकवाड,अजय पगारे, आदित्य बारी, आकाश गायकवाड, आनंद गायकवाड, यश पगारे, प्रजोत शिरसाट, प्रतीक प्रधान,अनिल पगारे, गौतम सोनवणे, अनिल गायकवाड,राजू भाऊ काळे, सचिन भाऊ शिंदे, संदीप राजू पगारे, राजू पगारे, भीमराज साबळे, विजय पगारे, अनिकेत निकम, सचिन ओहोळ, सचिन वाघ, शोभा श्रीखंडे, छाया पगारे, संगीता पगारे, सुमनबाई गायकवाड, कस्तुराबाई पगारे, करुणाबाई निकम, वंदनाबाई गायकवाड, उषाबाई गायकवाड, छायाबाई गायकवाड, दिपाली पगारे, साईजाबाई निकम, विमलबाई प्रधान, मनीषाबाई गायकवाड, आशाबाई कांबळे, लताबाई कांबळे, सुशिलाबाई साबळे, सुनीताबाई पगारे, मंगलाबाई निकम, सुरेखा बाई वाघ, भारती बारी, रेणुका श्रीखंडे, ज्योतीबाई ओहोळ, ग्रामीण वैद्यकीय अधिकारी डॉ. शैलेश खंदारे,वी.डी. कारके, गणेश गोटकर, कैलास पाटील, सुनील वानखेडे आदी उपस्थित होते.

# आंबेडकरी अनुयायांनी वैचारिकदृष्ट्या संघटीत होण्याची गरज- शमिभा पाटील

**जालना | प्रतिनिधी**

आपल्या देशात क्रांती आणि प्रतिक्रांतीचे मोड ऑन झाले असून लोकशाही व संविधान विरोधकांच्या विरोधात आंबेडकरी अनुयायांनी वैचारिकदृष्ट्या संघटित होण्याची गरज जळगाव येथील पारलिंगी सामाजिक कार्यकर्त्या शमिभा पाटील यांनी येथे प्रतिपादित केली. जालना शहरातील स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या मैदानावर सुरू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प गुंफतांना त्या बोलत होत्या. ज्येष्ठ सामाजिक नेते सुधाकरराव रत्नपारखे हे यावेळी अध्यक्षस्थानी होते. भाजपचे नेते भास्कर दानवे, जालना जिल्हा परिषदेचे माजी सभापती सुदामराव सदाशिवे, डी. आर. सावंत, अशोक रगडे, मिलिंद कांबळे आदी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. विचारमंचावर डॉ बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे अध्यक्ष डॉ शांताराम रायपुरे, सचिव सुधाकर रतनराव रत्नपारखे यांची उपस्थिती होती.

' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व आपली जबाबदारी' या विषयावर विचार मांडताना शमिभा पाटील पुढे म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शोषित समाजाला श्वास दिला, त्याला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला. देशातील पितृसत्ताक व्यवस्थेविरुद्ध तसेच शोषणाविरुद्ध लढा देण्याचे विचार पेरले. समता, स्वातंत्र्य, बंधुता ही तत्वे दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक समतेसाठी संघर्ष केला, त्यांनी रक्तविहीन क्रांती करून शोषित, वंचित घटकांच्या आयुष्यात प्रकाश पेरला. शासनकर्ती जमात बनण्याचे त्यांचे स्वप्न होते. आजपर्यंत आपण अनु.जाती - जमातीना एकत्र करू शकलो नाही,त्यामुळे घटनेच्या मूळ गाभ्यातील आरक्षणाला संपविण्याचे षडयंत्र सुरू आहे.आंबेडकरी चळवळीचा सामाजिक लढा अनेकांनी पाहिला आहे, देशात निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीविरोधात लढण्यासाठी आंबेडकरी चळवळीची धार बोथट झाली आहे. ७५ वर्षांत आपल्या देशात आंबेडकरी विचारधारेचा पंतप्रधान झाला नाही, ही खेदाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांना आता आंबेडकरी राजकीय भुमिका घ्यावी लागणार आहे. लोकशाही व संविधान विरोधकांच्या विरोधात वैचारिकदृष्ट्या संघटित व्हावे लागणार आहे,




ही आता काळाची गरज आहे. बाबासाहेबांच्या सामाजिक समतेच्या आणि क्रांतीच्या विचारांचा गावोगावी- तांडा वस्तीवर जावून प्रसार करण्याची गरज आहे. डॉ.बाबासाहेब

आंबेडकर यांचे विचार केवळ पुस्तकात न ठेवता समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचविणे गरजेचे आहे, सामाजिक परिवर्तनासाठीडॉ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर आधारित पंचसूत्रीचा आंबेडकर अनुयायांनी अवलंब करावा, सामाजिक परिवर्तनासाठी प्रत्येकाने जबाबदारीने वागावे,असे आवाहनही शमिभा पाटील यांनी यावेळी केले. प्रमुख अतिथी म्हणून बोलतांना मिलिंद कांबळे यांनी जालना शहरात ४९वर्षापासून सुरू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेच्या माध्यमातून महापुरुषांचे विचार तळागाळातील समाजात पोहचवण्याचे कार्य सुरू असून बाबासाहेबांचे विचारच सामाजिक समतेसाठी उपयुक्त असल्याचे सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेच्या पाचव्या पुष्पाचे सूत्रसंचालन डॉ. शशिकांत पाटील यांनी केले तर संजय हेरकर यांनी आभार मानले. यावेळी ज्येष्ठ सामाजिक नेते ड. बी. एम. साळवे, ड. ब्रम्हानंद चव्हाण, राम गायकवाड, राम साळवे, ड. चत्रे,सुनील साळवे,प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, डॉ. कालीदास सूर्यवंशी,डॉ.विजय कुमठेकर, डॉ. प्रियदर्शन भवरे, दीपक धामने, बबनराव रत्नपारखे, दत्ता अंभोरे, राजेंद्र जाधव,सर्जेराव मगरे, ड. योगेश गाडगे, राजेश राऊत, सतीश वाहुळे, नारायण वाढेकर, महेंद्र रत्नपारखे, पंजाब खिल्लारे यांच्यासह पुरुष तसेच महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## थोडक्यात

### 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेची व्याप्ती वाढवणार - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**सातारा । प्रतिनिधी**

'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' ही योजना शेतकऱ्यांसह धरण क्षेत्रातील लाभार्थ्यांना खूप उपयोगी आहे. या योजनेची व्याप्ती राज्यात वाढवणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालय व नाम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कोयना धरणातील गाळ काढण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे याचा शुभारंभ दरे तालुका महाबळेश्वर येथे उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी जिल्हाधिकारी संतोष पाटील, उपवन संरक्षक अमोल सातपुते, वाईचे प्रांताधिकारी डॉ. योगेश खरमाटे, साताराचे प्रांताधिकारी आशिष बारकुल यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

उन्हाळ्यामध्ये धरणाची पाणी पातळी कमी होते. पाणी पातळी कमी झाल्यामुळे धरणातील गाळ काढल्यानंतर पाण्याची क्षमता ही वाढते व गाळाचा उपयोग शेतीमध्ये केला जातो. यामुळे शेती अधिक सुपीक व कृषी उत्पन्न जास्त देते. त्यामुळे ही योजना शेतकऱ्यांसह धरण क्षेत्रातील लाभार्थ्यांसाठी फार महत्त्वाची आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी धरणांमधील व तलावांमधील गाळ काढून तो आपल्या शेतात टाकावा व आपली शेत जमीन जमीन सुपीक करून कृषी उत्पन्न वाढवावे, असे आवाहनही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

### महाराजस्व अभियान ठरले एक इव्हेंट. सर्व सामान्य जनता अनभिज्ञ, राजकीय पुढाऱ्यांनी घेतला ताबा चर्चेचा विषय.

**टेंभूर्णी । प्रतिनिधी**

जाफराबाद तालुक्यातील टेंभूर्णी येथे नुकतेच १२ एप्रिलला महाराजस्व अभियान पार पडले, मात्र अभियानाचा मूळ उद्देश बाजूला पडला व त्यात व्यासपीठावर सनदी अधिकाऱ्यांच्या पेक्षा राजकीय पुढाऱ्यांनी ताबा मिळवला व हे अभियान केवळ एक इव्हेंट ठरल्याचे दिसून आले. महाराष्ट्र शासनाने एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून राज्यातील सर्व प्रशासनाला आदेशित करून सरकारने घेतलेल्या विविध उपक्रम व नवीन कायदेविषयक बाबींची माहिती व्यापक प्रमाणावर करण्याचे अपेक्षित होते व त्यानुसार राज्यातील प्रत्येक विभागात व जिल्ह्यात या अभियानाच्या आयोजनाचा भडिमार सुरू आहे. परंतु येथे मात्र तातडीची एकही कारवाई केली गेली नाही व प्रलंबित असलेल्या प्रकरणाची कारवाई ठरवून प्रदर्शित करण्यात आली. तसेच या अभियानाच्या बाबत फारसा गवगवा झाला नसल्याने बहुतेक स्थानिक नागरिक, गरजू तक्रारदार, तक्रार दाखल करू इच्छित नागरिक याबाबत काही माहितीच नाही अशी चर्चा करीत होते व त्यांचा चांगलाच हिरमोड झाला.

कार्यक्रमाच्या ठिकाणी प्रशासनातील कर्मचारी, अंगणवाडी कार्यकर्ती महिला सदस्य व पदाधिकारी, बचतगटाच्या महिला, शिक्षण क्षेत्रातील मंडळी यांनी खुर्च्या बळकावल्या मुळे बरेच शेतकरी, मजुर, ताटकळत बाजूला उभे होते. स्थानिक शहरातील प्रमुख मान्यवरांसह अनेक जण या कार्यक्रमापासून वंचित होते. शिबिरात रखडलेले फेरफार, अनेक वर्षांपासून सिद्ध झालेली अतिक्रमणे काढण्याबाबत, गावोगावी असलेल्या अतिक्रमणाची व इतर सोयी सुविधा, गैरसोयी याबाबत ची माहिती एकत्र करून वर्षानुवर्षे प्रलंबित अर्जाबाबत फेर तपासणी व न्यायदान , महसुली क्षेत्रातील शेतावरील अतिक्रमणे, जमिनीचे वाद, पाणंद रस्त्यांच्या बाबत प्रशासनाने राजकीय दबावामुळे जाणूनबुजून वाळीत टाकलेली व दुर्लक्षित केलेली प्रकरणे याबाबत प्रशासनातील अधिकारी यांनी अवाक्षरही काढले नाही. केवळ राजकीय कार्यक्रमाप्रमाणे फोटो सेशन घेऊन दिखावा केला व आपली हौस भागवून घेतली. शासनाचा मूळ उद्देश सर्व सामान्य जनतेला न्याय देण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे व पर्यायाने लोकाभिमुख शासनाचा प्रत्यय जनतेला यावा असा होता परंतु असे काही न होता वेगळं चित्र पहायला मिळाले.

# शहर विकासाचा पाया ठरणारी जनगणना प्रशिक्षण मोहिमेचा यशस्वी समारोप

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून आगामी जनगणना प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर क्षेत्रीय प्रशिक्षकांसाठी ( फील्ड ट्रेनर्स) यांच्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या विशेष प्रशिक्षण मोहिमेचा यशस्वी समारोप करण्यात आला. ६ एप्रिल ते ११ एप्रिल २०२६ या कालावधीत शहरातील विविध प्रशिक्षण केंद्रांवर ही सत्रे पार पडली. या प्रशिक्षणासाठी नियुक्त करण्यात आलेले मास्टर ट्रेनर उपायुक्त पंकज पाटील, उपायुक्त अण्णा बोदडे, नायब तहसीलदार स्वाती नरूटे यांनी प्रत्यक्ष मार्गदर्शन करत प्रशिक्षणार्थींना जनगणनेच्या प्रत्येक टप्प्याची सखोल माहिती दिली.

या प्रशिक्षण सत्रांमध्ये जनगणना प्रक्रियेची उद्दिष्टे, घरगुती सर्वेक्षण करण्याची अचूक पद्धत, माहिती संकलन करताना घ्यावयाची काळजी, तसेच नागरिकांशी प्रभावी संवाद साधण्याचे तंत्र यांचा समावेश होता. यासोबतच डिजिटल साधनांचा वापर करून माहिती नोंदविण्याची पद्धत, प आधारित डेटा एन्ट्री, तसेच माहितीची पडताळणी आणि अचूकता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक बाबींचेही सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशिक्षणादरम्यान प्रत्यक्ष सराव (प्रॅक्टिकल) सत्रांवर विशेष भर देण्यात आला, ज्यामुळे प्रगणक व पर्यवेक्षकांना प्रत्यक्ष काम करताना येणाऱ्या अडचणींची कल्पना आली आणि त्यावर उपाययोजना समजून घेता आल्या. तसेच विविध उदाहरणांच्या माध्यमातून डेटा संकलनातील अचूकता आणि पारदर्शकता कशी राखावी याचेही प्रशिक्षण देण्यात आले.



या प्रशिक्षणामुळे क्षेत्रीय प्रशिक्षक अधिक आत्मविश्वासाने व सक्षमपणे काम करण्यास सज्ज झाले आहेत. आगामी जनगणना प्रक्रियेत अचूक, विश्वासार्ह आणि वेळेत माहिती संकलित करण्यासाठी हे प्रशिक्षित मनुष्यबळ अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. त्यामुळे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेली अचूक लोकसंख्यात्मक माहिती उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार असून, नियोजनबद्ध विकासाच्या दृष्टीने ही प्रक्रिया अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

जनगणना प्रक्रियेचा पहिला टप्पा १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत राबवण्यात येणार असून, या टप्प्यात घरगुती सर्वेक्षणाद्वारे शहरातील प्रत्येक कुटुंबाची सविस्तर माहिती संकलित केली जाणार आहे. यामध्ये कुटुंबातील सदस्यांची संख्या, वय, शिक्षण, व्यवसाय, निवासस्थिती तसेच इतर आवश्यक सामाजिक व आर्थिक बाबींचा समावेश असेल. या सर्वेक्षणामुळे शहराची अचूक लोकसंख्या आणि सामाजिक रचना समजून घेण्यास मदत होणार आहे. पहिल्या टप्प्यानंतर प्रत्यक्ष जनगणना प्रक्रिया सुरू केली जाईल, ज्यामध्ये संकलित माहितीची पडताळणी आणि अंतिम नोंदणी केली जाईल. ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक, शिस्तबद्ध आणि अचूक पद्धतीने पार पाडण्यावर महापालिकेचा भर आहे. असे डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका यांनी म्हटले.

अचूक आणि प्रशिक्षित मनुष्यबळामुळे जनगणना प्रक्रिया अधिक पारदर्शक, परिणामकारक आणि विश्वासार्ह होणार आहे. या प्रशिक्षणामुळे प्रत्यक्ष क्षेत्रात काम करताना आवश्यक कौशल्ये, तांत्रिक ज्ञान आणि आत्मविश्वास मिळेल. डिजिटल साधनांचा योग्य वापर, नागरिकांशी प्रभावी संवाद आणि माहिती संकलनातील अचूकता यामुळे संपूर्ण जनगणना प्रक्रिया अधिक सुलभ आणि गतिमान होईल. भविष्यातील शहर नियोजनासाठी ही माहिती अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.असे सचिन पवार, उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका यांनी म्हटले.

## मुरुड तालुक्यातील ताराबंदरला कांदळवन कत्तल

**अलीबाग । प्रतिनिधी**

मौजे कोलमांडला (ताराबंदर), ता. मुरुड - पर्यावरणीय संवेदनशील किनारी भागात राष्ट्रीय हरित लवाद (छत्रद्ध) व रायगड जिल्हाधिकारी यांच्या स्पष्ट पुनर्लागवडीच्या आदेशांचे उल्लंघन करत १२ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी पुन्हा अनधिकृत माती भरावाचे काम सुरू झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यापूर्वी कोट्यवधी रुपयांचा दंड व वन विभागाकडून गुन्हा दाखल झालेल्या या ठिकाणीच पुन्हा पोकलेन/गउइ मशिनद्वारे भराव टाकण्यात येत असल्याचे स्थानिक ग्रामस्थांच्या व्हिडिओ पुराव्यात कैद झाले आहे.

ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेताच कंत्राटदार व कामगारांनी अरेरावीची भाषा वापरत फॉरेस्टच्या परवानगीने काम सुरू आहे असा खोटा दावा करत दडपण्याचा प्रयत्न केला. मात्र ग्रामस्थांच्या ठाम विरोधानंतर कंत्राटदाराने यंत्रसामग्री कंपाऊंडमध्ये लपवली व पळ काढला. हा संपूर्ण प्रकार व्हिडिओत रेकॉर्ड असून, संबंधित विभागांना पाठवण्यात आला आहे. विशेष म्हणजे, फणसाड वन्यजीव विभागाचे ठऋज नितीन ढगे यांना माहिती देऊनही कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.



ठढख कार्यकर्ते प्रतीक कणगी यांनी मुरुड तहसीलदार आदेश डफळ व ठऋज नितीन ढगे यांच्याशी संपर्क साधला असता, दोघांनीही जबाबदारी झटकून वन विभागाला विचारा असे सांगितले. फोटो व व्हिडिओ दाखवूनही कोणतीही कारवाई झाली नाही. शनिवार-रविवारी रात्रीच्या भरावादरम्यान ग्रामस्थ विचारणा करत असताना अरेरावीची भाषा व अनुचित प्रकार घडला तर महाराष्ट्र शासन किंवा रायगड जिल्हाधिकारी जबाबदारी घेतील का? असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

यापूर्वी महसूल विभागाने दंड व वन विभागाने गुन्हा दाखल केला असतानाही पुन्हा काम सुरू होणे हे प्रशासनाच्या निष्क्रियतेचे गंभीर उदाहरण आहे. छत्रद्ध व जिल्हाधिकारी आदेश असताना अनधिकृत भराव कोणाच्या संरक्षणाखाली सुरू आहे? तहसीलदार आदेश डफळ व ठऋज नितीन ढगे यांच्यात दोषी कंत्राटदारांशी बंद दाराआड देवाणघेवाण झाली का? अशी चर्चा ताराबंदर ग्रामस्थांमध्ये जोर धरत आहे. महाराष्ट्र शासनाने या अधिकाऱ्यांची कायदेशीर चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी तीव्र होत आहे.

ताराबंदर ग्रामस्थ मंडळाने संबंधित विभागांकडे तात्काळ कारवाईची मागणी केली असून, दोषींवर कडक कारवाई न झाल्यास न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे.

## बेलोशीतील परेश गुंड ऑनलाइन 'नफा'च्या जाळ्यात अडकून ६ लाख १६ हजारांची फसवणूक!

**अलीबाग । प्रतिनिधी**

सोशल मीडियावरून 'मोठा नफा'चे आमिष दाखवत बेलोशीतील ४७ वर्षीय व्यापाऱ्याची तब्बल ६ लाख १६ हजार ११३ रुपये ४० पैसे उकळल्याचा प्रकार उघडकीस आला. फेसबुक आणि व्हॉट्सअँप द्वारे विश्वास बसवून यूपीआय लिंकने टप्प्यांटप्प्याने रक्कम काढली गेली.



रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, तपास पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे करीत आहेत.अलिबाग तालुक्यातील बेलोशी येथील परेश गुंड (वय ४७) हे स्थानिक रहिवाशी आहेत. २९ मार्च ते ७ एप्रिल २०२६ या कालावधीत फेसबुकवर एका अज्ञात महिलेने त्यांच्याशी संपर्क साधला. व्हॉट्सअँप चॅटिंग आणि व्हॉईस कॉलद्वारे तिने विश्वास संपादन केला. ऑनलाइन ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळेल, असे सांगत तिने एक मोबाईल लिंक पाठवली.

गुंड यांनी त्या लिंकवर क्लिक करून यूपीआयद्वारे छोट्या रकमेपासून सुरू करून हळूहळू एकूण ६,१६,११३.४० रुपये ट्रान्सफर केले. नफा दिसायला लागल्याने विश्वास वाढला, पण नंतर रक्कम अडकल्याचे उमगून त्यांनी रेवदंडा पोलीसांकडे तक्रार केली. पोलिसांनी तात्काळ गुन्हा नोंदवला. तपासात फसवणूक गँगचा कसब दिसत असल्याचे सूत्रांनी सांगितले. या प्रकरणाने सोशल मीडियावरील गुंतवणूक फसवणुकांचा उलगडा झाला आहे.मोबाईल चॅटिंगमधील 'नफा'च्या स्वप्नांना सावध!

रेवदंडा पोलीसांनी नागरिकांना इशारा दिला: सोशल मीडियावरून येणाऱ्या ऑनलाइन गुंतवणूक योजनांना सावध! अनोळखी लिंक कधीच क्लिक करू नका. नफा दाखवून फसवणूक करणाऱ्या गँगकडून सावध राहा. आर्थिक व्यवहार पूर्वी पडताळणी करा. गेल्या वर्षी महाराष्ट्रात अशा फसवणुकांनी लाखो रुपयांची लूट झाली आहे. चॅटिंगमधील 'नफा' फसवणूक ठरू शकते - कुटुंबीयांना सांगा! असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## परतूर तालुक्यातील येनोरा गावच्या शिरपेचात मानाचा तुरा

**परतूर । प्रतिनिधी**

परतूर तालुक्यातील येनोरा येथील विलास तुकाराम दवंडे यांची ठाणे शहर पोलीस दलात, तर कोमल कारभारी उगले हिची पुणे शहर पोलीस दलात निवड झाली आहे. दोघांनीही जिद्द व चिकाटीच्या जोरावर 'खाकी वर्दीचे' स्वप्न साकार केले.



या दुहेरी यशाबद्दल गावकऱ्यांच्या वतीने सोमवारी भव्य सत्कार व विजयी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतषबाजीत व घोषणांनी दुमदुमलेल्या वातावरणात मिरवणूक काढण्यात आली. यावेळी गावातील महिला, युवक व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत वाढलेल्या विलास दवंडे याने आर्थिक अडचणी, मर्यादित साधने व कुटुंबाची जबाबदारी सांभाळत दिवसरात्र अभ्यास व कठोर शारीरिक सराव केला. अनेक वेळा अपयश येऊनही खचून न जाता, नव्या जोमाने उभा राहून लेखी परीक्षा व मैदानी चाचणी यशस्वीरीत्या पार केली.

'कठीण परिस्थितीतही प्रामाणिक प्रयत्न, जिद्द व सातत्य असेल तर यश निश्चित मिळते. विलास व कोमल यांचे यश आजच्या तरुणांसाठी प्रेरणादायी आहे,' असे गावातील मान्यवरांनी सांगितले. यशामागे कुटुंबाचे मोलाचे योगदान असल्याचेही नमूद करण्यात आले.

सत्कारप्रसंगी पुष्पगुच्छ देऊन दोघांचा सन्मान करण्यात आला. 'अशा यशामुळे गावाची ओळख उंचावते व इतरांना नवी दिशा मिळते,' अशी भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली.

## सोशल मीडियातून फसवणूक; प्रेमाच्या बहाण्याने तरुणीवर अत्याचार, पालघर हादरले

**मुंबई । प्रतिनिधी**

सोशल मीडियाचे जसे फायदे आहेत, तसेच अनेकदा त्याचे तोटेही समोर आले आहेत. सोशल मीडियातून गुन्हेगारी देखील वाढल्याचं दिसून आलं, त्यातून पोलिसांच्य सायबर सेलकडे जबाबदारीचे काम सोपविण्यात आले आहेत. सोशल मीडियातून ओळख, नंतर प्रेम, लग्न आणि गंभीर गुन्ह्यासारख्या घटना यापूर्वी देखील अनेकदा घडल्या आहेत. आता, पालघर जिल्ह्यातही अशीच एक घटना समोर आली आहे. इंस्टाग्रामवरुन मैत्री करून तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे हा प्रकार लव्ह जिहाद असल्याचा आरोप केला जात आहे.

पालघरमधील इंस्टाग्राम प्रेम हा लव्ह जिहादचा प्रकार असल्याचा आरोप बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेकडून करण्यात आला आहे. याप्रकरणात पीडित तरुणीने पालघरच्या केळवे पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनंतर, मूळचा बीड येथील असलेल्या आरोपीला पोलिसांकडून पुण्यातून अटक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे ओळख करताना आणि प्रेमाच्या जाळ्यात ओढताना आरोपी तरुणाने आपली ओळख खोटी दिल्याची फिर्याद या महिलेने दिली आहे. पीडित तरुणी ही हिंदू आदिवासी समाजातील असून आरोपी हा मुस्लिम समाजाचा असल्याने हा सर्व लव्ह जिहादचा प्रकार असल्याचा आरोप विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल यांनी पत्रकार परिषद घेत केला आहे.

याप्रकरणी, पीडित तरुणीने केळवे पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनंतर, भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ६९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून केळवे पोलिसांकडून सध्या पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणात विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने लव्ह जिहादसारखे गंभीर आरोप केले आहेत. तर पीडीतेकडून माझ्यासोबत जो प्रसंग घडला, तो इतरांबरोबर घडू नये. त्यामुळे, सोशल मीडियापासून सावध राहावं असं आवाहन पीडितेने केलं आहे.

तसेच, बजरंग दलाकडून मला मदत झाली म्हणून मी निभावली असेही एक व्हिडिओ प्रसारण करत तिने सांगितलं. दरम्यान आरोपीचं यापूर्वी लग्न झालेलं असून त्याने पीडीतेला जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न केला, यासंदर्भात पोलीस अधिक तपास करत आहेत अशी माहिती डी.वाय. एस.पी विकास नाईक यांनी सांगितलं आहे.

# भीषण अपघात; ११ जणांचा मृत्यू, अनेक जखमी

**मुंबई । प्रतिनिधी**

कल्याण-अहिल्यानगर (कल्याण-मुरबाड-माळशेज) महामार्गावर आज सोमवारी सकाळी रायते गावाजवळील उल्हास नदीवरील नव्या पुलावर अत्यंत भीषण अपघात घडून ११ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातामुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली असून राज्यभरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुरबाडहून कल्याणकडे प्रवासी घेऊन जाणारी ओम्नी कार (क्र. MH-05 G--0529) आणि अशोक लेलँड कंपनीचा मिक्सर ट्रक (क्र. MH-12 TV-3660) यांच्यात समोरासमोर जोरदार धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती की ओम्नी वाहनाचा अक्षरशः चक्काचूर झाला. अपघाताची वेळ सकाळी सुमारे १०:४५ ते ११ वाजण्याच्या दरम्यान असल्याचे सांगितले जात आहे. अपघाताची माहिती मिळताच कल्याण तालुका पोलीस, टिटवाळा पोलीस तसेच स्थानिक बचाव पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अपघातग्रस्त वाहनांमध्ये अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी मोठ्या प्रमाणावर बचावकार्य राबविण्यात आले. जखमींना तातडीने जवळील रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले असून काहींची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.

या अपघातामागे ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न व चालकाची निष्काळजीपणा हे प्राथमिक कारण समोर येत आहे. तसेच ओम्नी वाहनाची अधिकृत क्षमता ५+१ असताना त्यामध्ये तब्बल ११ प्रवासी प्रवास करत होते. त्यामुळे अपघाताची तीव्रता वाढून मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाल्याचे स्पष्ट होत आहे. या दुर्घटनेत मृत्यू झालेल्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत : प्रशांत चेदणे, भूषण घोरपडे, अनंता पवार, दीपक गवळी, नेहा मोहपे, मानसी मोहपे, प्रथमेश मोहपे, जिजागा केमबारी आणि गणपती मदे. याशिवाय आणखी दोन जणांचा मृत्यू झाल्याची माहिती असून त्यांची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. विशेष म्हणजे, मृतांमध्ये एकाच कुटुंबातील तीन मुलींचा समावेश असल्याने परिसरात शोककळा पसरली आहे. तसेच महसूल विभागातील एका कर्मचाऱ्याचाही या दुर्घटनेत मृत्यू झाला आहे. या अपघाताबाबत राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शोक व्यक्त करत अधिकृत निवेदन जारी केले. त्यांनी सांगितले की, अवैध प्रवासी वाहतूक व क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी घेणे ही अत्यंत गंभीर बाब असून अशा प्रकारांविरोधात कडक कारवाई केली जाईल. या प्रकरणी संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.



दरम्यान, या भीषण अपघातानंतर स्थानिक नागरिक संतप्त झाले असून प्रशासनाविरोधात रोष व्यक्त करत आहेत. नव्याने उभारण्यात आलेला पूल पूर्णपणे सुरक्षित नसतानाही घाईघाईत वाहतुकीसाठी खुला करण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. तसेच या मार्गावर वाहतूक नियंत्रणाचा अभाव आणि सतत होणारे नियमभंग यामुळे अपघातांची संख्या वाढत असल्याचेही नागरिकांनी सांगितले.

या घटनेनंतर पोलिसांनी वाहतूक काही काळासाठी वळवून परिस्थिती नियंत्रणात आणली. अपघातग्रस्त वाहनांना बाजूला करण्यात आले असून मार्ग पुन्हा सुरू करण्यात आला आहे. मात्र या दुर्घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांचा वापर टाळावा, तसेच वाहनचालकांनी वाहतुकीचे नियम पाळून सावधगिरीने वाहन चालवावे.

अशा प्रकारच्या निष्काळजीपणामुळे निरपराध नागरिकांचे जीव जात असल्याने याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज व्यक्त होत आहे.

## संक्षिप्त

### सामाजिक कार्यकर्ते लखन राठौर यांना राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार प्रदान

**जालना । प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्ते लखन राठौर यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम राष्ट्रीय जीवन गौरव - २०२६ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. मुंबईचे आयकर आयुक्त डॉ. सचिन मोटे यांच्या हस्ते त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ए.डी. फाउंडेशनच्यावतीने पुण्यातील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात 'राष्ट्रीय गौरव पुरस्कार वितरण सोहळ्याचे' आयोजन करण्यात आले होते. विविध सामाजिक क्षेत्रांत काम करणाऱ्या युवा-युवती आणि महिला-पुरुषांना प्रोत्साहन देण्यासाठी हा सोहळा आयोजित केला जातो. या सोहळ्यात लखन राठौर यांना 'आदर्श समाजसेवी व उत्कृष्ट वक्ता' म्हणून गौरवण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सौ. रुक्मिणीताई गलांडे आणि पुण्याचे सहाय्यक पोलीस आयुक्त राम मांडुरके यांची उपस्थिती होती. व्यासपीठावर डॉ. विलास क. कन्नाके, पुण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय गोरड, पंजाब सरकार द्वारे भारत भूषण पुरस्काराने सन्मानित दिगंबर तायडे आणि मुंबई उच्च न्यायालयाचे वकील ड. अशोक शिंदे यांची उपस्थिती होती.

राठौर हे पर्यावरण, व्यसनमुक्ती, योग, प्राणायाम, ध्यान आणि निसर्गोपचार यांसारख्या विषयांवर मोफत शिबिरे व व्याख्याने आयोजित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. त्यांच्या याच निस्वार्थ सेवेची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. त्यांना भरीव सामाजिक कार्यासाठी याआधीही अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यात लोकजागृती प्रतिष्ठानतर्फे 'परिवर्तन रत्न पुरस्कार', स्वामी रामानंदतीर्थ संस्था व इतर संघटनांतर्फे 'मराठवाडा गौरव पुरस्कार' आणि आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनतर्फे 'योग रत्न पुरस्कार' या पुरस्काराचा समावेश आहे. या सोहळ्याचे सूत्रसंचालन निवेदिका नम्रता बगारेचा यांनी केले तर ए.डी. फाउंडेशनचे महाराष्ट्र अध्यक्ष श्री. अशोक श्रीपती गोरड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### समता सप्ताहानिमित्त उसतोड कामगारांना स्मार्ट कार्ड वाटप

**जालना । प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय जालना, मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, छत्रपती संभाजीनगर तसेच आधार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत मराठवाडा ग्रामीण विकास संस्था संचलित आरोग्य पोषण खात्रीशीर उपाय योजना प्रकल्पाच्या माध्यमातून उसतोड कामगारांना स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात आले. तसेच बचत गट, एकल महिला, युवक व युवती यांना समाज कल्याण विभागाच्या विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमाला विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. यामध्ये श्रीमती सुकेशिनी काबळे (जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जालना), श्री अनंत शिंदे (जिल्हा उद्योग केंद्र व्यवस्थापक), श्री कैलास तावडे (जिल्हा अग्रणी बँक, जालना), श्रीमती स्नेहल मोदळे (सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जालना), श्रीमती संगिता मंकरद (उपायुक्त, समाज कल्याण विभाग), श्री अविनाश बहीरे (बहुजन कल्याण विभाग, जालना) मा भाउसाहेब गुजाळ जिल्हा संपर्क अधिकारी जालना एकनाथ राऊत (जिल्हा समन्वयक जालना) व श्री राजेश वाघमारे (घनसावंगी) यांची उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. या उपक्रमामुळे उसतोड कामगारांमध्ये शासकीय योजनांबाबत जागरूकता निर्माण होऊन त्यांना सक्षमीकरणाची दिशा मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# जालना प्रभाग क्रमांक १ मध्ये 'घाणीचा अड्डा'

## या प्रभागाची गंमत म्हणजे बीजेपी कार्यालयासमोरच घाणीचे साम्राज्य, या प्रभागात पाच नगरसेवक निवडून आलेले आहे भाजपचे





**जालना । प्रतिनिधी**

आज दिनांक १२ रविवार रोजी सकाळी नऊ वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना शहरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये अक्षरशः घाणीचे साम्राज्य पसरले असून, नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे.

विशेष म्हणजे, या प्रभागात भाजपचे तब्बल पाच नगरसेवक निवडून आलेले असताना आणि त्याच भागात पक्षाचे जिल्हा संपर्क कार्यालय असताना, कार्यालयासमोरच कचऱ्याचे ढिगारे साचलेले दिसत आहेत. त्यामुळे स्वतःच्या दारासमोरील घाण साफ करता येत नसेल, तर शहर काय स्वच्छ करणार? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. या भागातील अस्वच्छतेबाबत वारंवार माध्यमांत बातम्या प्रसिद्ध होऊनही नगरसेवक मात्र अजूनही कुंभकर्णाच्या झोपेत असल्याचे दिसत आहे. निवडणुकीच्या वेळी मोठमोठ्या आश्वासनांचा पाऊस पाडणारे हेच लोकप्रतिनिधी आता नागरिकांच्या मूलभूत समस्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, स्वच्छतेच्या नावाखाली फक्त कंत्राटदारांचे हित जपले जात असून 'टक्केवारी'च्या खेळात जनतेच्या आरोग्याची पर्वा उरलेली नाही. आमच्या टीमने प्रत्यक्ष पाहणी केली असता, अनेक दिवसांपासून कचरा न उचलल्याचे स्पष्ट झाले. ओला-सुक्या कचऱ्याचे ढिगारे १५-१५ दिवस तस्सेच पडून राहतात, परिणामी परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. स्वच्छता कर्मचारी नियमित येत नसल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. त्यातच पाण्याची टंचाईही नागरिकांच्या जिव्हारी लागली आहे.

एका बाजूला 'स्वच्छ शहर, सुंदर शहर'च्या घोषणा केल्या जात असताना, प्रत्यक्षात मात्र प्रभाग क्रमांक १ मध्ये घाणीचा विळखा घट्ट होत चालला आहे. त्यामुळे आता तरी भाजपचे नगरसेवक जागे होणार का? की नागरिकांना अजूनही घाणीच्या विळख्यातच जगावे लागणार? असा संतप्त सवाल सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत.

## भाजप नगरसेवकांचे महानगरपालिकेला निवेदन; मोकाट कुत्र्यांचा त्रास वाढल्याची तक्रार

**जालना । प्रतिनिधी**



जालना शहरात मोकाट कुत्र्यांचा त्रास मोठ्या प्रमाणात वाढत असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. याबाबत भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांनी जालना महानगरपालिकेकडे लेखी निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, शहरातील विविध भागांमध्ये मोकाट कुत्र्यांची संख्या वाढली असून लहान मुले, महिला आणि दुचाकीस्वार यांना वारंवार त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा कुत्र्यांच्या हल्ल्याच्या घटनाही घडत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेषतः रात्रीच्या वेळेस कुत्र्यांच्या टोळ्या रस्त्यावर फिरत असल्याने अपघातांची शक्यता वाढली आहे. चंदनझीरा परिसरात गौरव खरात या पाच वर्षाच्या मुलाला मोकाट कुत्र्याने गळ्यावर चावा घेऊन लचका तोडला. तर शिवनगर, दत्तनगर येथील चार वर्षीय मुलाला चावा घेऊन लचका तोडला. जालन्यातील घाटी रुग्णालयात असे बरेच जण ऊपचार घेत आहेत ज्यांना मोकाट कुत्र्यांनी चावा घेतला.

यासंदर्भात महानगरपालिकेने तात्काळ मोकाट कुत्र्यांचे निर्बीजिकरण व लसीकरण मोहीम राबवावी, तसेच कुत्र्यांना पकडून सुरक्षित ठिकाणी हलविण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर नगरसेवक अशोक आण्णा पांगारकर,शशिकांत घुगे,कपील भुरेवाल,आनंद झारखंडे,शितलप्रसाद आडेकर या नगरसेवकांच्या स्वाक्षऱ्या असून, प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## जालना पोलिसांचे शक्तीप्रदर्शन! डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीपूर्वी शहरात भव्य पथसंचलन

**जालना । प्रतिनिधी**



कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जालना पोलीस प्रशासन पूर्णपणे सज्ज असल्याचे चित्र आज शहरात पाहायला मिळाले. उद्या १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी शहरात भव्य पथसंचलन करून आपली तयारी दाखवून दिली.

पथसंचलनामध्ये सदरबाजार पोलीस ठाण्याचे पो.निरि, संदिप भारती,कदीम जालना पोलीस ठाण्याचे पो.निरि. जनार्धन शेवाळे, उपनिरीक्षक आरती जाधव, उपनिरीक्षक संदीप सानप, उपनिरीक्षक आनंद सिंग साबळे यांच्यासह दिडशे पोलीस कर्मचाऱ्यांचा ताफा होता.

आज काढण्यात आलेल्या या पथसंचलनाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातून करण्यात आली. त्यानंतर कादराबाद, पाणी वेस, गरीबशाह बाजार, मस्तगड, गांधी चौक अशा प्रमुख मार्गांवरून पोलिसांचा ताफा फिरला. या पथसंचलनामुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, संभाव्य अनुचित प्रकारांना आळा बसणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

पोलिसांनी शहरातील संवेदनशील भागांवर विशेष लक्ष ठेवले असून, कोणत्याही परिस्थितीत कायदा हातात घेणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा यावेळी देण्यात आला. तसेच नागरिकांनीही शांतता व सहकार्य राखून जयंती उत्सव साजरा करावा, असे आवाहन उपविभागिय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या वतीने करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने जालना शहर सज्ज झाले असताना, पोलिसांच्या या पथसंचलनामुळे शहरात शांतता व सुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## महापालिकेत केबिन नाही, म्हणून सभापतींचा मंडपातच कारभार! जालन्यात प्रशासनाचा भोंगळ कारभार उघड

**जालना । प्रतिनिधी**



आज दिनांक १३ सोमवार रोजी दुपारी दोन वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना महानगरपालिकेच्या कारभारातील बेफिकिरीचा कळस गाठणारी धक्कादायक बाब समोर आली आहे. निवडणुकीला तब्बल तीन महिने उलटूनही विषय समितीच्या सभापतींना अद्याप केबिन उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. प्रशासनाच्या या ढिसाळ आणि उदासीन भूमिकेमुळे अखेर स्थायी समितीचे सभापती अशोक पांगारकर आणि संध्या देठे यांनी थेट महापालिका परिसरात मंडप टाकूनच कामकाज सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

सभापतींची निवड झाल्यानंतर त्यांना स्वतंत्र केबिन देणे ही महापालिकेची प्राथमिक जबाबदारी असताना, दोन सर्वसाधारण सभा पार पडूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. परिणामी, लोकांच्या तक्रारी आणि प्रश्न सोडवायचे कसे, असा गंभीर प्रश्न सभापतींसमोर उभा राहिला.

प्रशासनाच्या निष्क्रियतेला कंटाळून अखेर पांगारकर आणि देठे यांनी महापालिकेच्या ओपन स्पेसमध्ये मंडप उभारून तेथूनच जनतेच्या समस्या ऐकण्यास आणि निर्णय घेण्यास सुरुवात केली आहे. केबिन मिळेपर्यंत आम्ही इथूनच कामकाज चालू ठेवणार, असा ठाम इशारा त्यांनी दिला आहे. या प्रकारामुळे महापालिका प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारावर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. आता तरी प्रशासन जागे होणार का, की मंडपातच चालणार महापालिकेचा कारभार, असा सवाल जालन्यातील नागरिक विचारत आहेत.

## बार्टी कडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जंयती निमित्त सामान्य ज्ञान बहुपर्यायी परिक्षा घेण्यात आली

**वसमत । प्रतिनिधी**



भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त पंचशील नगर जयंती मंडळाच्या वतीने सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमासाठी बार्टी चे मिलिंद आळणे सर यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य स्पर्धा घेण्यात आली.या स्पर्धेसाठी पंचशील नगर संस्थेचे अध्यक्ष किशनराव रणवीर सर , सुनील मनोहरे सर, गुलाब खंदारे सर, वाळवंटे सर, कोकरे साहेब, दीपक भिसे एस बीआय लाइफ चे मॅनेजर विश्वनाथ सूर्ये सर,अविष्कार मनोहरे नगरसेवक पवन खंदारे, रोहित राऊत, सुशील धोतराज, दानपाल मोरे, विजय लांडगे, रोहन खंदारे व पंचशील नगर जयंती मंडळ हे यावेळेस विद्यार्थी व विदयार्थी नी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काँग्रेसच्या बैठकीत गदारोळ; निरीक्षकांसमोरच कार्यकर्त्यांचा संताप उसळला!

## जालन्यात काँग्रेसची 'संघटन' बैठक ठरली रणांगण; आरोप-प्रत्यारोपांत गोंधळ

**जालना । प्रतिनिधी**

काँग्रेस पक्षाच्या संघटन सृजन अभियानाच्या बैठकीत आज मोठा गोंधळ उडाल्याची घटना समोर आली आहे. शहरातील हॉटेल सॅफरॉन येथे आयोजित या बैठकीत गुजरातहून आलेले पक्ष निरीक्षक हेमंत सिन्हा पटेल यांच्या उपस्थितीतच कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत संताप व्यक्त केला.

जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला जालना शहरासह जिल्हाभरातून शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मात्र बैठक सुरू होताच जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्या कामकाजावर काही कार्यकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. तुम्ही भाजप आणि शिंदे गटाला मदत करता असा थेट आरोप करत महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष




नंदा पवार यांनी आक्रमक भूमिका घेतली.

यावर प्रत्युत्तर देताना आम्ही नव्हे, तुम्हीच भाजपला मदत करता असा पलटवार करण्यात आला आणि दोन्ही गटांमध्ये जोरदार वाद झाला. काही क्षणातच हा वाद चिघळत गोंधळात परिवर्तित झाला. परिस्थिती इतकी बिघडली की एकमेकांवर चपला उगारण्यापर्यंत प्रकार पोहोचला.

घटनेची गंभीरता लक्षात घेता पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

मात्र या घटनेमुळे काँग्रेसमधील अंतर्गत वाद पुन्हा एकदा उघडपणे समोर आला असून पक्ष संघटनातील मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. एकंदरीत, संघटन मजबूत करण्याच्या बैठकीतच पक्षातील फूट उघड झाल्याने काँग्रेससमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी थेट मारण्यासाठी पायातील चप्पल काढली होती तात्काळ कार्यकर्त्यांनी त्यांना पकडले

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड,
मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**